महाराष्ट्र शासन
सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, MIRAJ
Website: gmcmiraj.edu.in ▸ Email: deangmcmiraj@yahoo.co.in ▸ Phone: 0233/2232090-99 ▸ Fax: 0233-2231959

जा.क्र.शावैममि/अ/कपनि/जाहिरात/ ८७८६ /२०२३,

दिनांक: ०९/१०/२०२३

महत्त्वाचे / तातडीचे

प्रति,
मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण)
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज येथील चिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमाफ्रत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

संचालनालयाचे संकेतस्थळारील जाहिरातीस मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ :- १) या कार्यालयाचे जाहिरात पत्र क्र.शावैममि/अ/कपनि/जाहिरात/९००२/२०२३, दिनांक: १३ /०९/२०२३

सन्माननीय महोदय,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने तात्पुरत्या नियुक्तीसाठी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे या www.med-edu.in संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. संकेतस्थळावर अर्ज भरण्याचा कालावधी दिनांक २७.०९.२०२३ ते ०९.१०.२०२३ असा आहे.

दिनांक ०९-१०-२०२३ अखेर संचालनालयाच्या संकेतस्थळावर फक्त ०३ उमेदवारांचे (क्ष-किरण विषयात ०२ व शल्यचिकित्सा विषयात ०१) अर्ज दिसुन येत आहेत. या संस्थेतील अध्यापकांची रिक्त् पदे एनएमसी त्रुटी पुर्ततेकरीता/रुग्णसेवेकरीता/शैक्षणिक कार्यासाठी तातडीने भरणे आवश्यक आहे. उर्वरीत विषयातील रिक्त पदांसाठी अजुन काही उमेदवार अर्ज करण्याची शक्यता असल्याने संचालनालयाचे संकेतस्थळावर सदर जाहिरातीनुसार सदर अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ०९-१०-२०२३ ऐवजी दिनांक १३-१०-२०२३ पर्यंत वाढविण्यात यावी व तसे संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुधीर दि.ननंदकर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज